# *ताईचा डबा*

ऐकावे ते नवलच किंवा तुम्हास माहिती आहे का अशा सदरात मोडणाऱ्या अनेक गोष्टींपैकी एक गोष्ट म्हणजे आमची ताई ! खरं म्हणजे म्हणजे ताईची जाडी ! 'आमची ताई एकेकाळी अगदी हडकुळी होती' असं तुम्हाला मी सांगितलं तर तुम्ही म्हणाल "खरं की काय ? ऐकावे ते नवलच !".. तर ही काटकुळी ताई बी. एस्सी. झाली.

पदार्थ विज्ञान विषयात एम्. एस्सी करण्यासाठी तिने विद्यापीठात प्रवेश घेतला. हिला कसे झेपणार अशी काळजी आईने व्यक्त केली. पण आईचे ऐकतो कोण ! बसने जाऊन येऊन पहिले सहा महिने पार पडले. पण मध्यंतरी काही तरी परोपकारीपणाच्या उद्योगामुळे दगदग झाली. आजारी पडली. तास बुडाले ,अभ्यास बुडला, म्हणून ताण पडू लागला. अभ्यास भरून काढायला वेळ पुरेना म्हणून वसतिगृहात राहून पुढील अभ्यास करावा असे ठरले. वसतिगृहातल्या खोल्या पटकन भरत. तिथे अभ्यासू मुली थोडया असत. पण पुष्कळ मुली मजेसाठी आलेल्या ! काही बागईतदारांच्या , काही उनाडक्या करणाऱ्या पण शिस्त लागावी म्हणून पालकांनी जोर करून पाठवलेल्या श्रीमंतांच्या मुली होत्या.

आमचा प्रश्न वेगळा होता. घर गावात होते. त्यामुळे ताईला घरचे जेवण देता येणार होते. म्हणजे लाड सुरू ! शिवाय रोज डब्यातून चिठ्ठीची सोय. म्हणजे काय हवे काय नको ते कळण्याची सोय. त्यावेळी फोनची आजच्यासारखी सोय नव्हती. हल्ली पहिलीची मुलेसुध्दा घरचा अभ्यास विचारण्यासाठी वरच्या मजल्यावरच्या मैत्रिणीला फोन करतात !

तात्पर्य काय तर ताईने वसतिगृहात रहावे असे ठरले. खोल्या सगळया भरलेल्या तरी एक खोली रिकामी होती. त्याची एक गंमतच होती. तशी ती गंमत इतरांना "बापरे" वाटणारी होती. तिथे एका मुलीने पंख्याला साडी बांधून फास लावून घेतला होता. केसरीत आम्ही ती बातमी बाचली होती. शिवाय परांजप्याने ती सुरस आणि चमत्कारिक बातमी आणखीच रंगवून सांगितली होती. आता त्या भीमकाय मुलाला नसेल वाटली भीती. पण इतरांचे काय ?
तीच खोली ताईला मिळणार असे कळले. आता मिळते आहे तर सोडा कशाला म्हणून कु. चि. रजनी बाला व आमची ताई कु. चि. विद्याबाला ( वीरबाला उच्चपद पूर्ण ) दोघी वसतिगृहात दाखल होण्यासटी अर्ज करून आल्या.

उषाताईंच्या म्हणजे रजूच्या आईच्या मानसशास्त्रीय प्रयोगांनी रजूलाही धीट बनवले होते. त्याकाळी शास्त्र शाखा, फर्गसन महाविद्यालय, नंतर एम्. एस्सी व विज्ञान विषय हे सर्वच भाव मारण्याचे विषय. आता तर "भुताच्या खोलीत रहाणाऱ्या मुली " असे आणखी एक तेजोवलय या दोघींना मिळाले.

वस्तितिगृहातल्या मुलींनी यांना आपापल्या परीने सल्ले दिलेले... काहींनी बाबुराव अर्नाळकरांच्या कांदंबरीतील भाषा वापरून भिववण्याचा प्रयत्नही केला. " अग, त्या रूम नं चोवीस ची हकिगत माहिती आहे ना ? तुम्ही कसे धाडस केलेत ? पहा बरं, रात्रभर दिवा ठेवत जा. उद्या घरून रामरक्षेचे पुस्तक मागवून घ्या. रात्री खिडकीतून बाहेर बघू नका. इथे रात्री आवाज येतात... रूमवर रात्री एकटया राहू नका.. दिवसासुध्दा !....". असे एक ना दोन .. अनेक सल्ले. आम्ही त्या रहस्यकथेत फार न गुंतता तयारीला लागलो. आईने ताईला ठासून विचारले , " तुझी त्या खोलीत

रहायची तयारी आहे ना ? " त्य ठाशीवपणात अर्थ एवढाच होता की आता रोज भक्कम डबा देऊन तिकडे वसतिगृहात धाडणार आहे तर फक्त अभ्यासच करा.. उगीच अवांतर परोपकाराच्या गोष्टीत वेळ दवडू नका..जबाबदारीने वागा..

वसतिगृहात जाण्याची तयारी तशी सुटसुटीत होती. तीन साडया,वगैरे कपडयांची गादीत घालून वळकटी , एक कंगवा, एक आरसा, एक बादली तपेली..बस एवढंच सामान. . भारंभार कपडे, चपलांचे ढीग, मेकप, पर्सेस वगैरेचं प्रस्थ नव्हतं आणि आम्हाला रसही नव्हता. तर अशी आमच्या काटकुळया ताईची हडकुळी वळकटी वसतिब्गृहात दाखल झाली. मी म्हटल बरे झाले ताई अडकली. आता सर्व उपक्रम बंद! अर्थात मोठेपणी विविध क्षेत्रात गाजणारी सर्वच मंडळी आपापल्या कालेजच्या दिवसात अनेक उपद्व्याप करत असतात.

रजू व ताई यांच्या नादाने हेमाने ही अभ्यास करावा या प्रामाणिक इच्छेने हेमाच्या आईने तिलाही दाखल केले. ही तिसरी रूमपार्टनर. आता या तिघी एकमेकींच्या नादाने काय करतात हा मला प्रश्नच होता.त्यांनी वसतिगृहात कोणत्यातरी परोपकारी पथकाची शाखा सुरू करायला कमी केले नसते !

वसतिगृहात पाठवण्यासाठी मग एक तीन पुडांचा डबा खरेदी करण्यात आला. त्यावर "हरडीकर" असे नाव घातले होते. अजूनही तो डबा आमच्या घरी आहे. आणखी जांभळया फुलांच्या कापडाचे तुकडेही आमच्या कडच्या चिंध्यांच्या गाठोड्यात आहेत. त्या कापडाचीही एक नवलाची गोष्ट ! पहिल्याच दिवशी ताईची डब्यातून चिठ्ठी.
" इथे मला चारचौघीसारखे रहायचे तर गाऊन घालायला हवा. तेव्हा एक गाऊन शिवून पाठव."
आता हा गाऊन हा काय प्रकार असतो हे आम्हाला माहितीच नव्हते. आम्ही घरी आल्यावर जुनी विटकी साडी
नेसत असू. ताईने दिलेल्या वर्णनावरून तो किमोनोसारखा काही प्रकार असावा असा अंदाज आईने बांधला. मग अम्ही हे जांभळया फुलांचे छानसे कापड आणले आणि किमोनोसारखा दिसणारा हा गाऊन मी आईच्या मदतीने शिवला.
व्हर्सिटी वगैरे ज्याला हल्ली म्हणतात, त्या पुणे विद्यापीठाच्या बसने मी एका शनिवारी गेले व विद्यार्थिनी वसतिगृहाच्या स्टॉपला उतरून थेट ताईच्या रूमवर गेले. बरोबर तिचे काही किरकोळ सामान , तो किमोनो व मुख्य म्हणजे तो तीन पुडांचा 'हरडीकर' डबा.!..

विद्यापीठाचा रम्य परिसर मला फारच आवडला. त्यामुळे मी त्यानंतही अनेक वेळा विद्यापीठात आणि ताईच्या रूमवर जात राहिले. .. रजूनं एक स्टोव्ह आणला होता. त्यवर या मुली डब्यातलं अन्न गरम करायच्या. चहा करायच्या. चहाच्या वासावर की काय, पण ताईच्या रूमवर खूप मुली आजच्या भाषेत म्हणायचं तर "पडलेल्या" असायच्या. आशा नावाची एक दणदणीत मुलगी होती. कीर्ती नामे एक बडबडी मुलगी होती...

एकदा त्यांच्या वर्गातला एक मुलगा अपघातात पाय मोडून बसला होता, तेव्हा ते निमित्त काढून या महिला समूहाने मुलांच्या वसतिगृहाचीही सफर केली होती. असल्या गंमती जमती ताईच्या चिठ्यातून असायच्या. हा विश्राम नावाचा मूलगा अगाने थोराड. प्रध्यापक शोभेल असा. वर्गातल्या मुलींना रात्री घरी जायल उशीर झाला तर सोबतीला जाण्यचे काम त्याच्याकडे असे. त्याचा फायदा घेऊन नीती नावाच्या एका मुलीने डेक्कन जिमखान्याच्या वस्तादपणे आपले शिक्षण आणि लग्न त्या च्याबरोबर मार्गस्थ केले. तिची बहीण माझ्यावरोबर संस्कृत शिकायला येत असे. ती बिचारी साधी. पण ही नीती ढालगज! लग्न झाल्यावर सासूवर इंम्प्रेशन मारण्यासाठी नाना युक्त्या करीत असे.

वर्गात्ल्या एका गरीव आज्ञाधारक विध्यार्थ्याला वेठीला धरून ती सगळा स्वयंपाक त्याच्याकडून करून घेत असे. नंतर हा विध्यार्थी मागील दाराने सटकून वर्गात हजेरी लावायला जात असे. त्यानंतर या आचारी मुलाने सुगृणींचा सल्ला असतो, तसे "सद्गृहस्थांचा सल्ला" असे एखादे पुस्तक लिहिले असावे..

परवा आईला भेटायला गेले होते तेव्हा तो जुना तीन पुडांचा डबा अचानक दिसला, आणि सगळ्या जुन्या आठवणी जाग्या झाल्या. तो विध्यापीठाचा रम्य परिसर.. त्या रूम नंबर २४वर मारलेल्या चकरा.. त्या सायकल वरून केलेल्या कॉलेजच्या सहली... ग्रंथपालनाचा कोर्स करतांना जयकर ग्रंथालयालाला दिलेल्या भेटी .. जुन्या वस्तू या जुन्या डायऱ्यांसारख्या असतात.. स्काऊटची निळी पिशवी, जुनी बासरी, रावळगाव गोळ्यांचा डबा, सत्तर वर्षांपूर्वीच्या दोन कुंच्या, जुनी प्रगतिपुस्तके ..आणि हा जुना तीन पुडांचा डबा.. आठवणींचा केवढा तरी खजिना..
खरं तर त्या डब्यातून येजा करणाऱ्या चिठयाही ठेवायला हव्या होत्या.. मजेदार आठवणींच्या पागोळयाच त्या.. एका रम्य काळाचं सरोवर निर्माण करणाऱ्या..

विजया वीरकर ,
चिपळूण
२००३